महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु एक्सलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९

वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


क्र. संकीर्ण/प्र.नि.प्रा/प्र.प्र.प.का/२८५/ २०१८

दिनांक : ३०/११/२०१८

प्रति,

संचालक तथा नोडल अधिकारी,
वैद्यकीय शिक्षण/तंत्रशिक्षण/उच्चशिक्षण
आयुष/कला/कृषी/माफसू

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रिया पडताळणीचे कामकाज संगणकीकृत प्रणालीने करण्याबाबत.**

**संदर्भ :- दि.२९/११/२०१८ रोजी प्रवेश नियामक प्राधिकरणाची बैठक वि.क्र. ७ (A)**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या प्रवेश पडताळणी प्रक्रियेकरीता नोंदणी प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदर प्रक्रियेदरम्यान ज्या संस्था/ महाविद्यालयांचे नोंदणी करण्याचे राहून गेले असेल अशा संस्था/ महाविद्यालयांकरीता एक अंतिम मुदत देऊन दि.०१/१२/२०१८ ते दि.०५/१२/२०१८ पर्यंत नोंदणी करीता www.safalta.org हे संकेतस्थळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. शासकीय/अनुदानित संस्थांना विना विलंबशुल्क नोंदणीची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तथापि खाजगी विनाअनुदानित संस्थांकरीता प्रति विद्यार्थी रु.२,०००/- व कमाल रु.५०,०००/- इतका विलंबशुल्क भरुन नोंदणी करता येईल.

नोंदणी न झालेल्या संस्थांची यादी यापूर्वीच आपणाला पाठविण्यात आली आहे, तरी अशा संस्था/महाविद्यालयांना त्वरित नोंदणी करण्याच्या सूचना आपल्या स्तरावर करण्यात याव्यात. या नंतरही जर खाजगी/ विनाअनुदानित संस्थांनी नोंदणी करण्यास चुकारपणा दाखविल्यास अशा संस्था/ महाविद्यालयांतील प्रवेशीत विद्यार्थ्यांना मान्यता देण्यात येणार नाही. तसेच विना नोंदणी शासकीय/ अनुदानीत संस्थांची माहिती शासनाकडे पाठविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(आ.प्र.रायते) भा.प्र.से.
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण,मुंबई

D:\rutuja Rutuja\Malekar Sir\kalp tech\date extended tech 29-11-2018.docx

प्र.क्र.:- विकाओ/शिक्षण/सफलता/२०१८/ 2875
सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.
दिनांक:- 01 DEC 2018

प्रत:- प्राचार्य, संबंधित संस्था, अमरावती विभाग, अमरावती त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रामध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी.

सहसंचालक तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, अमरावती.

प्रतिलिपी:- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी